**ठळक बातम्या**

- आंतरपीक आणि सेंद्रीय शेतीवर भर देण्याचं प्रधानमंत्र्यांचं आवाहन, प्रधानमंत्री किसान सन्मान निधीच्या हप्त्याचं वितरण

- नितीश कुमार उद्या घेणार बिहारच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ

- बाबा सिद्दीकी यांच्या हत्येतला प्रमुख आरोपी अनमोल बिश्नोईला अमेरिकेतून भारतात आणलं, ११ दिवसांच्या NIA कोठडीत रवानगी

- ५६वा भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव-इफ्फी उद्यापासून गोव्यात

**आणि**

- डेफलिंपिक स्पर्धेत अभिनव देश्वाल आणि प्रांजली धुमाळ या जोडीला सुवर्णपदक

**<><><><><>**

शेतकऱ्यांनी एकच पीक घ्यायची पद्धत सोडून आंतरपीक घ्यावं तसंच सेंद्रीय शेतीला प्राधान्य द्यावं असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. तामिळनाडूमधे कोईम्बतूर इथं दक्षिण भारत प्राकृतिक कृषी शिखर संमेलन २०२५ चं उद्घाटन आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमात प्रधानमंत्री किसान सन्मान निधीच्या १८ हजार कोटी रुपयांच्या २१ व्या हप्त्याचं वितरण प्रधानमंत्र्यांनी केलं. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून...

**होल्ड कॅप्सूल**

*(शेतीचं आधुनिकीकरण करण्यासाठी सरकार सकारात्मक पावलं उचलत आहे, किसान क्रेडिट कार्डच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दहा लाख कोटी रुपयांची मदत सरकारने दिल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. गेल्या अकरा वर्षात देशातल्या कृषी क्षेत्रात परिवर्तन झालं असून भारत नैसर्गिक शेतीसाठी ग्लोबल हब बनत आहे, असं प्रधानमंत्री मोदी यावेळी म्हणाले. जैविक खतावरचा जीएसटी कमी केल्यामुळेही शेतकऱ्यांनी मोठी मदत झाली असून गेल्या काही वर्षात भारताची कृषी निर्यात दुप्पट झाली आहे, असं ते म्हणाले.*

***होल्ड बाईट मोदी***

*किसान सन्मान निधीच्या २१ व्या हप्त्याचे 1 हजार ८०८ कोटी २५ लाख रुपये महाराष्ट्रातल्या ९० हजारापेक्षा जास्त शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाले. शेतकऱ्यांना हप्ता मिळाला की नाही हे तपासण्यासाठी सरकारने पोर्टल आणि मोबाईल ॲपची सोय केली आहे, असं कृषीमंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले.)*

**<><><><><>**

सेवा परमो धर्मा ही भारतीय संस्कृतीची मध्यवर्ती संकल्पना आहे. अनेक शतकांपासून या संकल्पनेनं सर्वांना मार्गदर्शन केलं आहे. याच संकल्पनेच्या आधारे सत्यसाईबाबांनी कार्य केलं, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज म्हणाले. आंध्र प्रदेशात पुट्टपर्थी इथले अध्यात्मिक गुरू श्री सत्यसाईबाबा यांच्या जन्मशताब्दी कार्यक्रमात ते बोलत होते.

**<><><><><>**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज सातवी अर्थसंकल्पपूर्व बैठक घेतली. २०२६-२७ च्या आगामी अर्थसंकल्पाच्या अनुषंगानं त्यांनी बँकिंग, वित्त सेवा आणि विमा क्षेत्रातल्या तज्ज्ञांशी चर्चा केली. अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरीही या बैठकीला उपस्थित होते.

**<><><><><>**

संयुक्त जनता दलाचे प्रमुख नितीश कुमार यांची आज बिहारमधल्या राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या विधिमंडळ पक्षनेतेपदी निवड करण्यात आली. पाटणा इथे झालेल्या रालोआच्या नवनिर्वाचित आमदारांच्या संयुक्त बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. तत्पूर्वी नितीश कुमार यांची संयुक्त जनता दलाच्या तर सम्राट चौधरी यांची भाजपच्या विधिमंडळ पक्षनेतेपदी निवड करण्यात आली. संध्याकाळी त्यांनी राज्यपाल आरिफ मोहम्मद खान यांची भेट घेऊन सत्ता स्थापनेचा दावा केला. यावेळी त्यांनी २०२ आमदारांच्या पाठिंब्याचं पत्र दिलं. राज्यपालांनी त्यांना सत्ता स्थापनेसाठी आमंत्रित केलं आहे. नितीश कुमार उद्या दहाव्यांदा बिहारचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतील. पाटणा इथल्या गांधी मैदानावर शपथविधी सोहळ्याचं

आयोजन करण्यात आलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि इतर मान्यवर या सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत.

<><><><><>

कुख्यात गुंड अनमोल बिश्नोई याला नवी दिल्लीतल्या विशेष न्यायालयानं ११ दिवसांची NIA कोठडी सुनावली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दीकी यांच्या हत्येतला तो प्रमुख असून त्याला अमेरिकेतून भारतात परत आणलं आहे. तो कुख्यात गुंड लॉरेन्स बिश्नोई याचा भाऊ आणि सहकारी आहे. तो २०२२ पासून फरार होता. लॉरेन्स बिश्नोई याच्या संघटनेशी संबंधित अटक झालेला तो १९वा आरोपी आहे. राष्ट्रीय तपास संस्थेनं २०२३मध्ये अनमोलवर आरोपपत्र दाखल केलं होतं. बिश्नोई टोळीसाठी अमेरिकेतून दहशतवादी कारवाया केल्याचा आरोप अनमोल याच्यावर आहे.

<><><><><>

आंध्रप्रदेशातल्या रामपाचोदावरम इथं आज सकाळी सुरक्षा दलासोबत झालेल्या चकमकीत सहा ते सात नक्षली मारले गेले. यात काही वरिष्ठ नक्षली नेत्यांचा समावेश असल्याचं गुप्तचर विभागाचे अतिरिक्त महासंचालक महेश चंद्र लड्डा यांनी वार्ताहरांना सांगितलं. एनटीआर, कृष्णा, काकिनाडा, एलुरू या जिल्ह्यांमधून जवळपास ५० नक्षलींना अटक केली असून त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात स्फोटकं आणि शस्त्रं जप्त करण्यात आल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

५६वा भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव इफ्फी उद्यापासून गोव्यात सुरू होत आहे. या महोत्सवात ८१ देशांमधल्या २४० चित्रपटांचा समावेश असेल. द ब्लू ट्रेल या चित्रपटाने या महोत्सवाची सुरुवात होणार आहे. येत्या २८ तारखेपर्यंत हा महोत्सव चालेल.

<><><><><>

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ एस जयशंकर यांनी आज येकातरीनबर्ग आणि काझन इथे भारतीय वकिलातींचं उद्घाटन केलं. या नव्या वकिलातींच्या स्थापनेमुळे भारत आणि रशिया या दोन्ही देशांदरम्यान  व्यापार, पर्यटन, आर्थिक व्यवहार, संशोधन, शिक्षण आदि क्षेत्रांना चालना मिळेल, असं जयशंकर म्हणाले.

<><><><><>

रशियाने काल रात्री युक्रेनवर केलेल्या ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ल्यात १९ जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण जखमी झाले आहेत. यात टर्नोपील इथं एका ९ मजली इमारतीतील ३७ जण जखमी झाले. रशियाने शेकडो क्षेपणास्त्र आणि ड्रोन डागल्याचा आरोप युक्रेनने केला आहे.

<><><><><>

जपानचे प्रधानमंत्री साने ताकाईची यांनी तैवानसंबंधी केलेल्या वक्तव्यावरून तणाव वाढल्याने चीनने जपानकडून येणारी माशांची आयात थांबवण्याचा निर्णय घेतला आहे. चीनने तैवानवर लष्करी हल्ले केले तर जपानचं अस्तित्व धोक्यात येईल, असं ताकाईची म्हणाले होते. हे विधान मागे घेण्याविषयी चीनने सांगितल्यानंतरही ताकाईची यांनी नकार दिल्यामुळे ही आयात थांबवण्यात आली आहे.

<><><><><>

जपानमधे टोकिओ इथं सुरु असलेल्या २५ व्या डेफलिंपिक स्पर्धेत आज अभिनव देश्वाल आणि प्रांजली धुमाळ या भारतीय नेमबाज जोडीनं १० सीटर एअर पिस्टल स्पर्धेत सुवर्णपदक पटकावलं. अंतिम लढतीत त्यांनी चिनी तैपाईच्या जोडीला १६-६ असं पराभूत केलं.

तर, कुशाग्र सिंग राजावतनं ५० मीटर रायफल प्रोन स्पर्धेत कांस्य पदक पटकावलं. या स्पर्धेत नेमबाजीत भारतानं आतापर्यंत एकूण ११ पदकांची कमाई केली आहे.

<><><><><>

एकोणीस वर्षांखालच्या मुलांच्या विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत सलामीचा सामना करतांना भारत आणि अमेरिका यांच्यात होणार आहे. पुढच्यावर्षी १५ जानेवारी ते ६ फेब्रुवारी या कालावधीत झिम्बांब्वे आणि नामिबियामध्ये ही स्पर्धा होणार आहे. चार गटांमध्ये १६ संघ या स्पर्धेत सहभागी असून एकूण ४१ सामने होणार आहेत.

<><><><><>

फिफा विश्व चषक फूटबॉल स्पर्धेसाठी पात्र ठरणारा कुराको हा जगातला सर्वात लहान देश ठरला आहे. जमैकाविरुद्धचा सामना अनिर्णित राहिल्यामुळे कुराको फिफा विश्व चषक स्पर्धेसाठी पात्र ठरला.

<><><><><>

नव युवकांसाठीच्या देशातल्या पहिल्या टपाल कार्यालयाचं उद्घाटन आज आय आय टी दिल्ली इथे करण्यात आलं. या टपाल कार्यालयाच्या आखणीसाठी विद्यार्थ्यांची मदत घेऊन त्यांच्या गरजेच्या सुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत.

<><><><><>

बँकेतील खातेधाराकांना खातं ब्लॉक होण्यासंदर्भातला कोणताही व्हॉईस मेल रिझर्व्ह बँकेनं पाठवलेला नाही, असं सरकारनं स्पष्ट केलं आहे. काही नागरिकांना रिझर्व्ह बँकेच्या नावानं एक व्हॉईस मेल पाठवण्यात आल्याचे समोर आलं.

//<><><><><>//